महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र अंतर्गत कृषि विभागामार्फत रोपवाटिका तयार करणेसाठी तांत्रिक व आर्थिक मापदंड, मार्गदर्शक सूचना देणेबाबत

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१२/प्र.क्र. १ /रोहयो - १०अ
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ मार्च, २०१२

**वाचाः-** १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा,२००५.
२) शासन निर्णय,नियोजन विभाग,क्र.रोहयो-२००५/प्र.क्र.१९४/रोहयो-१०, दि.२३/१२/२००५
३) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायदा,२००६.
४) शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१०/प्र.क्र.४८/रोहयो-१० दि. ५ जून,२०१०.
५) शासन निर्णय क्र.मग्रारो-२०११/प्र.क्र.२/रोहयो-१०अ, दि.१५ ऑक्टोबर,२०१०.
६) शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१०/प्र.क्र.१२/रोहयो-१४, दि.११ नोव्हेंबर,२०१०.
७) शासन निर्णय क्र.मग्रारो-२०११/प्र.क्र.५४/रोहयो-१०अ, दि. २७ मे, २०११

**प्रस्तावनाः-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम,२००५ अंतर्गत राज्यामध्ये मग्रारोहयो टप्प्याटप्प्याने सुरु करण्यात आली असून दि. १ एप्रिल,२००८ पासून संपूर्ण राज्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. तद्नुसार संदर्भाधीन शासन निर्णय दि. २३ डिसेंबर, २००५ मधील अनुज्ञेय कामात रोपवाटिका व वृक्ष लागवड इत्यादीचा समावेश आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा सन २००५ मधील शेडयुल - १ मध्ये अनज्ञेय कामात वनीकरण व झाडे लावणे (Afforestation and tree planting) यांना प्राथमिकता दिलेली आहे.

सद्यस्थितीत राज्यात रोजगार हमी अधिनियम,१९९९ (सन २००६ मध्ये बदल केल्याप्रमाणे) अंमलात आहे. या अंतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजना सुरु असून सदर कायद्याच्या तरतुदीनुसार ५०% कामे ग्रामपंचायती मार्फत होणे आवश्यक आहे. तद्नुसार ग्रामपंचायतीमार्फत कामे होत आहेत व उर्वरित कामे कार्यान्वयीन यंत्रणामार्फत घेण्यात येत आहेत. त्याप्रमाणे इतर कार्यान्वित विभाग म्हणून कृषि विभाग कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावित आहेत. महाराष्ट्र शासनाने १०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम जाहीर केला असून वृक्ष लागवडीसाठी मोठया प्रमाणावर रोपे लागणार आहेत. सदर योजनेखाली कृषि विभागामार्फत वृक्ष लागवड करण्यासाठी कृषि विभागाच्या शासकीय रोपवाटीकेवर व प्रक्षेत्रावर

रोपांची निर्मिती करण्यासाठी तांत्रिक व आर्थिक मापदंड अद्याप निश्चित करण्यात आलेले नाहीत. आता कृषि विभागाने मापदंडाबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत कृषि विभागामार्फत रोपवाटिका तयार करण्यासाठी मापदंड निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत कृषि विभागामार्फत रोपवाटिका तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वेगवेगळया पिकांसाठी तांत्रिक व आर्थिक मापदंड निश्चित करण्यात येत असून परिशिष्ट - १ ते १८ प्रमाणे सोबत जोडण्यात आले आहेत.

१. सदरचा कार्यक्रम राबविताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सुचना तसेच निश्चित करण्यात आलेल्या खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१) ग्रामपंचायतीची शिफारस व मान्यता असणे आवश्यक आहे.
२) दर १५ दिवसांनी मस्टर प्रमाणे मजूरी प्रदान करावी.
३) मजूर उपस्थितीची नोद ग्रामसेवक / ग्राम रोजगार सेवक यांचेमार्फतच घेणे आवश्यक आहे.
४) रोपवाटीकेशी संबंधित सर्व अकुशल कामे जॉबकार्ड धारक मजूरांकडूनच करून घेण्याची जबाबदारी यंत्रणेची राहील.
५) मजूरीची रक्कम फक्त पोस्ट / बँकेमार्फतच दिली जाईल.
६) ग्राम रोजगार नोंदवहीत व ग्राम मालमत्ता नोंदवहीत सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.
७) MIS वरील सर्व प्रकारच्या नोंदी घेणे बंधनकारक आहे.
८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उपरोक्त कार्यक्रमांसाठी निधी उपलब्ध होणार असल्यामुळे या योजनेच्या सर्व निकषांचे पालन करणे आवश्यक आहे.
९) सदर कामांचे सामाजीक अंकेक्षण अनिवार्य असल्याने अकुशल व अर्धकुशल कामावरील खर्चाची सर्व प्रमाणके/पावत्या (vouchers) सामाजिक अंकेक्षणासाठी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

उपरोक्त अटी व शर्तीची काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी कृषि विभागाची राहील व केलेल्या कामाचे तात्काळ पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील

२. योजना राबविताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. विशेषत: रोहयो विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१०/प्र.क्र.२/रोहयो-१०अ, दि.१५ ऑक्टोबर,२०१० अन्वये

कुशल कामावरील (साधन सामुग्रीवरील)खर्चाबाबत मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय क्र.मग्रारो-२०११/प्र.क्र.५४/रोहयो-१०अ, दि.२७ मे,२०११ अन्वये मग्रारोहयो अंतर्गत इतर यंत्रणांची महत्त्वाची भूमिका व जबाबदारी तसेच शासन परिपत्रक क्र.मग्रारो-१०९०/प्र.क्र.८४/रोहयो-१, दि.१ नोव्हेंबर, २०११ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक राहील.

३. सर्वसाधारणपणे या कामांतर्गत रोपवाटीका व त्यावरील उपस्थित मजूर ग्रामीण भागातील असणे आवश्यक आहे. कारण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना फक्त ग्रामीण भागासाठी असून शहरी भागासाठी नाही. तथापि काही रोपवाटीका 'ब' किंवा 'क' वर्ग नगरपालिका हद्दीत कार्यरत असल्यास तेथे काम करणारा मजूर वर्ग लगतच्या ( ५ कि.मि. परिरसरातील ) ग्रामीण भागातील असणे आवश्यक आहे. तसेच या मजूरांकडे त्यांच्या गावातील जॉबकार्ड असणे अनिवार्य आहे. मात्र 'ब' किंवा 'क' वर्ग नगरपालिका हद्दीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत नविन रोपवाटीका घेऊ नयेत.

४. रोहयो विभागाचा शासन निर्णय क्र.मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०, दि.३ऑगस्ट,२०११ नुसार कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपरोक्त रोपवाटिका व वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत रु.२५ लाखापर्यंतच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार कृषि विभागाच्या संबंधित तालुका कृषि अधिका-यांना राहतील व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार (कार्यक्रम अधिकारी) यांना राहतील. तसेच रु.२५ लाखावरील कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार कृषि विभागाच्या संबंधित उपविभागीय कषि अधिकारी यांना राहतील व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २१२०३०१११११८२८३२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

वि. गिरीराज

**(व्ही. गिरीराज)**
**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-४०००३२
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा.मंत्री/राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-४०००३२

५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
६) प्रधान सचिव (रोहयो), नियोजन  विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
७) प्रधान सचिव, (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
११) संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो)
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो)
१५) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो)
१६) मुख्य अभियंता,लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), पुणे.
१७) सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
१८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१९) समिती अधिकारी, कार्यासन ड-७, महाराष्ट्र विधाामंडळ सचिवालय, विधान भवन,
२०) सर्व उपसचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी, (मग्रारोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय,
२१) कक्ष अधिकारी, रोहयो-१, सारसंग्रह
२२) निवड नस्ती,कार्यासन रोहयो-१० अ, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.